**Gomantak (Friday, 20th July 2018)**




नेत्रावळी : वनमहोत्सवानिमित्त शालेय विद्यार्थ्यांनी नेत्रावळीत काढलेली जागृती फेरी. (मनोदय फडते)

# डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयातर्फे नेत्रावळीत वनमहोत्सव उत्साहात

सांगे, ता. १९ (प्रतिनिधी) : सुळकर्णा येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यातर्फे नेत्रावळीत सरकारी प्राथमिक विद्यालय नेत्रावळीच्या विद्यार्थ्या समवेत वनमहोत्सव साजरा करण्यात आला. वनमहोत्सवाबद्दल जागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

या कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अनुभव मिळावा, यासाठी विद्यार्थ्यांचा गट निर्माण करून त्यांना ग्रामीण भागात पाठविण्यात आले असून त्यापैकी एक गट सहा महिन्यासाठी नेत्रावळीत कार्यरत होण्यासाठी बागायतदाराकडून अनुभव येण्याकरीता विविध कृषी माहिती घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून नेत्रावळीत वनमहोत्सव साजरा करण्यात आला.

सरकारी प्राथमिक विद्यालयाच्या प्रांगणात साजरा करण्यात आलेल्या वनमहोत्सवात नेत्रावळीचे उपसरपंच अभिजित देसाई शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देविदास, शिक्षिका प्रणाली गावकर उपस्थित होते.

उपसरपंच अभिजित देसाई यांनी पर्यावरणाचे महत्व पटवून देताना मनूष्याला शुद्ध हवामानासाठी झाडांची गरज व निघा कशी राखावी यावर माहिती दिली.

मुख्याध्यापक श्रीकांत देविदास यांनी सुखी, समृध्द जीवन जगण्यासाठी झाडांची निगराणी व घेण्यात येणारी काळजी या संदर्भात उपस्थितांना माहिती पुरविली. शिक्षिका प्रणाली गावकर हिनेही आपले विचार यावेळी व्यक्त केले. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रावळीत आतापर्यंत कृत्रीम अळंबी पैदास रोपट्याना लागणारी औषधे मातीचे निरीक्षण श्री पध्दतीची भात लागवड, असे अनुभव गावातील शेतकऱ्यांना दिले आहे.

प्रगतशील बागायतदारी कडूनही कृषी संदर्भात आवश्यक माहीती गोळा केली आहे. वनमहोत्सव यशस्वी होण्यासाठी कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.